महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पालघर यांचे कार्यालय

## (आस्थापना शाखा)

**पार्श्वनाथ ९, बिडको नाका, चिंतुपाडा, माहिम**
**पालघर, ता.जि. - पालघर**

दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११
Email ID : estcollectorpalghar@gmail.com

---

**वाचले** :- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: अकंपा/१००/प्र.क्र.५१/२००४/आठ, दि.२२/०८/२००५.

२. शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक प्राफेब.११०८/प्र.क्र.१६७/ठाणे/म-१०, दि.३१/०७/२०१४.

३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: अकंपा/१२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि.२१/०९/२०१७.

४. मा.उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२ यांचेकडील पत्र क्र.अकंपा-१२१७/प्र.क्र.१८२/का.८, दि. २३/०१/२०१८.

५. जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील ज्ञापन क्रमांक/सामान्य/का-१/टे-३/आस्था/अनुकंपा/प्रतिक्षासूची/२०१९, दि.११/०२/२०१९

६. जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील ज्ञापन सुधारीत अंतिम यादी क्रमांक/सामान्य/का-१/टे- ३/आस्था/ अनुकंपा/वर्ग-ड/ प्रतिक्षासूची/२०१९, दि.०३/०८/२०१९

७. या कार्यालयाकडील या कार्यालयाचे ज्ञापन क्र.महसूल/आस्था/क-१/टे.२/अनुकंपा/प्रा.म.प्र.सूची/एसआर-९३/२०१९, दि.२७.०८.२०१९

८. या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दिनांक३१/१२/२०१९

---

क्र.महसूल/आस्था/क-१/टे-२/अनुकंपा/अं.म.प्र.सूची/एसआर-११७/२०१९ दिनांक३१/१२/२०१९

---

**ज्ञापन :-**

१. ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.१ शासन निर्णय दिनांक २२/०५/२००८ मधील तरतुदींनुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडील सामायिक प्रतिक्षासूची बरोबरच संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील गट - क व गट - ड करीता प्रतिक्षासूची ठेवणेची दुहेरी प्रतिक्षासूची ची कार्यपध्दती आहे. सदर शासन निर्णयानुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांचे कार्यालयातील अनुकंपा प्रकरणांची छाननी करुन अनुकंपा उमेदवारांची नावे गट - क व गट - ड प्रतिक्षासूचीत समाविष्ट करुन, त्यांची नांवे संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सामायिक प्रतिक्षासूचीत समाविष्ट करण्यासाठी पाठवावी, अशी तरतूद आहे.

२. ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.२ शासन अधिसूचना, महसूल व वनविभागाकडील दिनांक ३१/०७/२०१४ अन्वये ठाणे जिल्हयाचे विभाजन हाऊन दिनांक ०१/०८/२०१४ रोजी पूर्वाश्रमीच्या ठाणे जिल्हयाचे विभाजन होऊन दिनांक ०१/०८/२०१४ पासून नवनिर्मित पालघर जिल्हा निर्माण झालेला आहे. शासन निर्णय, महसूल व वनविभागाकडील दिनांक १९/०८/२०१६ अन्वये ठाणे जिल्हयाचे विभाजनानंतर नवनिर्मित पालघर व ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे त्यांच्या विकल्पानुसार समायोजन करण्याकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या, त्यानुसार जिल्हा कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे विकल्प घेऊन त्यांच्या विकल्पानुसार समायोजनाची कार्यवाही करणेंत आलेली आहे.

३. त्याचप्रमाणे मुळ ठाणे जिल्हयातील दिनांक ३१/०७/२०१४ पूर्वीची अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीच्या सामायिक प्रतिक्षासूचीबाबत शासन स्तरावरुन मार्गदर्शक सूचना नसल्यामुळे ठाणे व पालघर जिल्हयाची प्रतिक्षासूची स्वतंत्र करणेबाबत कार्यवाही बाबत या कार्यालयाचे स्तरावरुन मा.विभागीय आयुक्त, कार्यालय कोंकण विभाग, कोंकण भवन व शासन यांना मार्गदर्शन मिळणेकामी विनंती करणेंत आली होती.